नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - १५८ | Issue - 158 | वार मंगळवार दि. २८ ऑक्टोबर २०२५ | Blow- Tuesday Date 28 October 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# आजपासून १२ राज्यांमध्ये एसआयआर सुरु

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञा-नेश कुमार यांनी पत्रकार परिषद घेत महत्त्वाची घोषणा केली आहे. उद्यापासून देशभरातील १२ राज्यांमध्ये एसआयआर (विशेष सखोल फेरनिरीक्षण) करण्यात येणार असल्याची माहिती मुख्य निवडणूक आयुक्तांनी दिली. १२ राज्यांमध्ये डखठ चा दुसरा टप्पा उद्यापासून सुरु होईल. या टप्प्यात मतदार यादी अद्ययावत केली जाईल. नवी मतदार जोडले जातील. सोबतच त्रुटी दूर केल्या जातील.

दुसऱ्या टप्प्यात १२ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये विशेष सखोल फेरनिरीक्षण करण्यात येईल. यामध्ये अंदमान निकोबार, गोवा, पुद्दुचेरी, छत्तीसगढ, गुजरात, केरळ, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, राजस्थान, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, लक्ष्यद्विप यांचा समावेश आहे. या यादीत महाराष्ट्राचा समावेश करण्यात आलेला नाही. राज्यात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. ३१ जानेवारीपर्यंत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयानं दिले आहेत.


महाराष्ट्रातील सगळ्या विरोधकांनी एकत्र येत मतदार याद्यांमधील घोळ निस्तरण्याची मागणी केली होती. जोपर्यंत मतदार यादीतील गोंधळ संपत नाही, तोपर्यंत निवडणूक घेऊ नका, अशी मागणी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी राज्यातील निवडणूक आयुक्तांची भेट घेऊन केली. यावेळी मनसे प्रमुख राज ठाकरे त्यांच्यासोबत उपस्थित होते. उद्यापासून १२ राज्यांमध्ये विशेष सखोल फेरनिरीक्षण सुरु होतं असलं तरी यामध्ये महाराष्ट्राचा समावेश नाही. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका जुन्याच मतदारयाद्यांच्या आधारे होणार ही बाब स्पष्ट झाली आहे.

दिल्लीत पत्रकार परिषद घेत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी डखठ ची माहिती दिली. 'बूथ लेव्हल अधिकारी प्रत्येक मतदाराच्या घरात किमान तीनदा जातील. नव्या मतदारांची नावं यादीत समाविष्ट करण्यात येतील. 'बूथ लेव्हल अधिकारी घराघरांत जाऊन फॉर्म-६ आणि डिक्लेरेशन फॉर्म गोळा करतील. नव्या मतदारांना अर्ज भरण्यासाठी मदत करण्याचं कामही 'बूथ लेव्हल अधिकारी करतील. 'बूथ लेव्हल अधिकारी त्यांच्याकडे असलेले अर्ज इलेक्टोरल रजिस्ट्रेशन ऑफिसर किंवा असिस्टंट कडे जमा करतील,' अशी माहिती ज्ञानेश कुमार यांनी दिली.




## जमीनदोस्त दुकानात ४८ मतदार, सगळेच घसीटाराम; आदित्य ठाकरेंचा निवडणूक आयोगावर बॉम्ब

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई: लोकसभा निवडणूक ते विधानसभा निवडणूक काळात मतदार याद्यांमध्ये बरेच घोळ झाले. त्याचमुळे लोकसभेला चांगली कामगिरी करणारी महाविकास आघाडी विधानसभेला पराभूत झाली, असा दावा शिवसेना उबाठाचे नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी मुंबईतील निर्धार मेळाव्यात केला. एकट्या वरळी मतदारसंघात १९ हजार ३३३ मतदारांच्या माहिती आणि तपशीलाबद्दल विसंगती असल्याचा दावा आदित्य यांनी केला. मुंबईतील कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी मतदार यादीतील घोळ मोठ्या स्क्रिनवर शिवसैनिकांना दाखवले.

मतदाराचं आणि वडिलांचं नाव सारखंच, महिला मतदारांच्या पुढे लिंग पुरुष अशी नोंद, मतदाराचं आडनाव मराठी, पण त्याच्या वडिलांचं आडनाव गुजराती, असे अनेक घोळ आदित्य ठाकरेंनी शिवसैनिकांना दाखवले. मुंबई महापालिका निवडणुकीआधी मतदार याद्या बारकाईनं तपासा. निवडणूक आयोग भाजपचं काम करत असल्यानं त्यांचं काम आता आपल्याला करायचं आहे, असा टोला आदित्य ठाकरेंनी लगावला.

'वरळीत शंभरी ओलांडलेले तब्बल ११३ मतदार आहेत हे सजल्यावर मला खूप आनंद झाला. शतायुषी व्हायचं असेल वरळीत घर या, अशी जाहिरात करा असा सल्ला मी इथल्या विकासकांना देणार आहे,' असा चिमटा आदित्य ठाकरेंनी काढला. यावेळी आदित्य यांनी मृतांची नावंदेखील अद्याप मतदार यादीत असल्याचं आणि त्यांच्या नावे मतदानदेखील होत असल्याचं सांगितलं. 'वरळीत राहणाऱ्या शालिनी पार्टे यांचं निधन २००० साली झालं. पण त्यांच्या नावानं आजही मतदान होतं. दिंदेशी तिवारी २००७ ला देवाघरी गेल्या. कृष्ण अडवाणी १९९५ मध्ये निवर्तले. तेव्हा मी केवळ ५ वर्षांचा होतो. आता मी ३५ वर्षांचा होतो. तेव्हा मरण पावलेले अडवणी आज पुन्हा मतदान करत आहे,' असं आदित्य ठाकरे म्हणाले. त्यांनी या सगळ्याचे पुरावे मोठ्या स्क्रिनवर दाखवले. या सगळ्या मृतांच्या नावावर कोणी मतदान केलं, असा सवाल त्यांनी केला.

काही मतदार ओळखपत्रांवर घरांचा पत्ता चुकीचा लिहिला आहे. त्यात प्रश्नचिन्ह, उद्गारवाचक चिन्ह आहेत. अशी घरं शोधायची कशी, असा सवाल आदित्य ठाकरेंनी विचारला. 'एखाद्या घरात ११ पेक्षा अधिक लोक राहत असतील तर तिथे जाऊन एठज नं पाहणी करायला हवी. तशी पाहणी केली गेली होती का? वरळीतील ४१७७ मतदारांचा पत्ताच सापडलेला नाही. ते कुठे राहतात, हे मतदार ओळखपत्रातील पत्त्यावरुन शोधलंच जाऊ शकत नाही,' असं ठाकरे म्हणाले.

घसीटाराम हलवाई या दुकानाच्या पत्त्यावर तब्बल ४८ जणांनी मतदार नोंदणी केल्याची माहिती आदित्य ठाकरेंनी दिली. 'एखाद्या दुकानाच्या नावावर, त्या पत्त्यावर मतदार नोंदणी होऊ शकत नाही. पण घसीटाराम हलवाईच्या पत्त्यावर ४८ मतदारांची नोंद आहे. पण धक्कादायक बाब म्हणजे हे दुकान तब्बल १० वर्षांपूर्वी पाडण्यात आलं आहे. नोंद करण्यात आलेल्या सगळ्या ४८ जणांची नावं घसीटाराम हलवाई आहेत,' असा स्फोटक दावा ठाकरेंनी केला. वरळीत ११ पेक्षा अधिक मतदार संख्या असलेली २१४ घरं असून यात ३३३५ मतदार राहतात, अशी नोंद आहे, अशी आकडेवारी ठाकरेंनी दिली.

## समृद्धीचा सागरीमार्ग, जगाला समुद्रमार्गाने जोडण्यासाठी भारताचा रोडमॅप; अमित शहांची माहिती

### सर्वांचे महासागर, सर्वांची समृद्धी; केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : 'संपूर्ण जग समुद्रमार्गाद्वारे जोडण्यासाठीचा भारताने रोडमॅप तयार केला आहे. त्यानुसार भारत सागरी क्षेत्रात फक्त स्वत:च्याच नाही, तर जगाच्या समृद्धीसाठी काम करेल. 'सर्वांचे महासागर, सर्वांची समृद्धी' यासाठी भारत काम करेल', असा संदेश केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शहा यांनी सोमवारी मुंबईत दिला.



'भारत सागरी आठवडा' ही जागतिक समुद्र आणि नौवहन क्षेत्राची सर्वांत मोठी ५ दिवसीय परिषद सोमवारपासून गोरेगावच्या मुंबई प्रदर्शन केंद्रात सुरू झाली. त्याचं उद्घाटन अमित शहा यांनी केलं. त्यावेळी त्यांनी 'अमृतकाल २०४७' अंतर्गत विकसित भारताचं लक्ष्य सागरी क्षेत्राद्वारेच पूर्ण करण्यासंबंधी उपस्थितांना मार्गदर्शन केलं.

'सागरी क्षेत्राचा भारताला ५ हजार वर्षांहून जुना इतिहास आहे. आज भारताची निम्मी लोकसंख्या सागरी किनारपट्टी असलेल्या राज्यांत राहते. यामुळेच भारताने सागरी क्षेत्रामार्गे विकासाचे लक्ष्य निश्चित केले आहे. याअंतर्गत मुंबईतील वाढवण बंदरासोबतच ग्रेट निकोबार येथे येऊ घातलेले ५०० कोटी डॉलर गुंतवणुकीचे बंदर महत्त्वाचे असेल. जगभरातील समुद्रांना जोडताना भारत अन्य देशांशी स्पर्धा करणार नसून, त्यातून सर्वांची समृद्धी व्हावी, असा उद्देश आहे', असं शहा म्हणाले.

'नौवहन क्षेत्राच्या विकासासाठी 'सागरमाला' प्रकल्पांतर्गत ७० अब्ज डॉलरचे प्रकल्प प्रस्तावित आहेत. त्यातील १७ अब्ज डॉलरचे २७२ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. कोची येथे २०० दशलक्ष डॉलर गुंतवणुकीतून देशातील सर्वांत मोठी सुकी गोदी उभी होत आहे. या सर्व माध्यमातून सागरी नौवहन क्षेत्राची उलाढाल ११८ टक्के व कार्गो उलाढालीत गेल्या ११ वर्षात १५० टक्के वाढ झाली आहे. यामुळेच देशाच्या २३.७ लाख किलोमीटरच्या सागरी विशेष आर्थिक क्षेत्रात गुंतवणुकीसाठी जगभरातील कंपन्या उत्सुक आहेत. त्यातूनच विकसित भारत २०४७ चे लक्ष्य पूर्ण होईल व ही परिषद त्या उद्दिष्टाला हातभार लावणारी आहे', असेही शहा म्हणाले.

केंद्रीय जहाज बांधणी, बंदरे आणि नौवहनमंत्री सर्वानंद सोनोवाल, केंद्रीय राज्यमंत्री शंतनू ठाकूर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह गुजरात, गोवा, ओडिशाचे मुख्यमंत्री, किनारपट्टी लाभलेल्या राज्यांतील मंत्री, १०० देशांचे प्रतिनिधी, जागतिक सागरी क्षेत्रातील कंपन्यांचे प्रतिनिधी, देशभरातील विविध बंदर प्राधिकरणांचे अधिकारी आदी यावेळी उपस्थित होते.

'भारत सागरी आठवडा'मध्ये शंभरहून अधिक देशांचा सहभाग असून ६८० सामंजस्य करार होत आहेत, अशी माहिती सर्वानंद सोनोवाल यांनी पत्रकार परिषदेत दिली. हे करार दहा लाख कोटी रुपयांच्या घरात असून, त्यातून सात लाख प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती 'भारत सागरी आठवडा' या मोठ्या परिषदेमुळे देश २०४७ पर्यंत सागरी आणि नौवहन क्षेत्रात महाशक्ती बनेल असा विश्वास निर्माण झाला आहे. या परिषदेत १.०५ लाख प्रतिनिधींनी नोंदणी केली होती, ज्यात ८५ देशांचे नागरिक, ११ देशांचे परराष्ट्र व्यवहारमंत्री, ३५० जागतिक वक्त्यांसह एकूण ४५० वक्ते सहभागी झाले होते. तसेच, पाच देश सहआयोजक म्हणून सहभागी झाले होते आणि ५०० प्रदर्शनकर्त्यांनी आपले स्टॉल्स लावले होते.

या परिषदेतून सागरी क्षेत्राचा विकास, क्षमता वाढवणे, जहाज बांधणी आणि त्याचे सुटे भाग या सर्वांची एक मजबूत परिसंस्था उभी करण्याची दिशा स्पष्ट झाली आहे. जरी मागील ११ वर्षांत सागरी मालवाहू क्षेत्रातील उलाढाल दुप्पट झाली नसली तरी, आता त्या दिशेने होणारी वाटचाल प्रत्यक्ष निकालात बदलताना दिसत आहे. या 'भारत सागरी आठवडा' परिषदेत पाच राज्यांचे मुख्यमंत्री आणि १६ राज्यमंत्री यांनीही आपला सहभाग नोंदवला. या परिषदेमुळे देशाच्या सागरी सामर्थ्याला नवी दिशा मिळाली आहे.

### बीआर गवईंकडून शिफारस

### १४ महिन्यांचा कार्यकाळ मिळणार

## न्यायमूर्ती सूर्यकांत भारताचे ५३ वे सरन्यायाधीश होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : वरिष्ठ न्यायमूर्ती सूर्यकांत हे भारताचे ५३ वे सरन्यायाधीश होतील. विद्यमान सरन्यायाधीश भूषण आर. गवई यांनी आज (२७ ऑक्टोबर) केंद्र सरकारकडे त्यांच्या नावाची शिफारस केली. यासह, सरन्यायाधीशांच्या नियुक्तीची प्रक्रिया सुरू झाली आहे. पारंपारिकपणे, विद्यमान सरन्यायाधीश कायदा मंत्रालयाने सांगितल्यानंतरच त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांची शिफारस करतात. विद्यमान सरन्यायाधीश गवई यांचा कार्यकाळ २३ नोव्हेंबर रोजी संपत आहे. न्यायमूर्ती सूर्यकांत २४ नोव्हेंबर रोजी सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतील. ते ९ फेब्रुवारी २०२७ रोजी निवृत्त होतील. त्यांचा कार्यकाळ अंदाजे १४ महिन्यांचा असेल. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश ६५ व्या वर्षी निवृत्त होतात.

न्यायमूर्ती सूर्यकांत हे भारतीय न्यायव्यवस्थेतील सर्वोच्च पदावर पोहोचणारे हरियाणातील पहिले व्यक्ती असतील. त्यांच्या नावाची शिफारस करताना, सरन्यायाधीश गवई यांनी सांगितले की, न्यायमूर्ती सूर्यकांत हे सर्वोच्च न्यायालयाचा कार्यभार स्वीकारण्यासाठी योग्य आणि सक्षम आहेत.

न्यायाधीश सूर्यकांत यांचा प्रवास हरियाणातील हिसारमधील पेटवाड या छोट्याशा गावातून सुरू झाला. त्यांचे वडील शिक्षक होते. त्यांनी आठवीपर्यंतचे शिक्षण गावातील शाळेत घेतले, जिथे बसण्यासाठी बाक नव्हते. इतर गावकऱ्यांप्रमाणे, न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी त्यांच्या कुटुंबाचे पालनपोषण करण्यासाठी मोकळ्या वेळेत शेतात काम केले. हिसारमधील एका लहानशा गावात, हांसी येथे दहावीच्या बोर्डाच्या परीक्षा देण्यासाठी गेल्यावर त्यांनी प्रथम शहर पाहिले.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत अनेक संवैधानिक खंडपीठांचे सदस्य राहिले आहेत. त्यांच्या कार्यकाळात, त्यांनी घटनात्मक, मानवी हक्क आणि प्रशासकीय कायद्याशी संबंधित १,००० हून अधिक निर्णयांमध्ये सहभाग घेतला. त्यांच्या प्रमुख निर्णयांमध्ये २०२३ मध्ये कलम ३७० रद्द करण्याचा निर्णय कायम ठेवणे समाविष्ट आहे.

डेरा प्रमुख गुरमीत राम रहीम यांच्याशी बलात्कार प्रकरणात तुरुंगात झालेल्या हिंसाचारानंतर २०१७ मध्ये डेरा सच्चा सौदाची संपूर्ण स्वच्छता करण्याचे आदेश देणाऱ्या पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाच्या पूर्ण खंडपीठाचा ते भाग होते.

न्यायाधीश सूर्यकांत हे वसाहतकालीन देशद्रोह कायदा स्थगित करणाऱ्या आणि सरकार त्याची समीक्षा करेपर्यंत त्याअंतर्गत कोणतेही नवीन एफआयआर दाखल करू नयेत असे निर्देश देणाऱ्या खंडपीठाचा भाग होते.

न्यायाधीश सूर्यकांत यांना सर्वोच्च न्यायालयाच्या बार असोसिएशनसह बार असोसिएशनमधील एक तृतीयांश जागा महिलांसाठी राखीव ठेवण्याचे निर्देश देण्याचे श्रेय दिले जाते.

न्यायाधीश सूर्यकांत हे १९६७ च्या अलिगढ मुस्लिम विद्यापीठाच्या निर्णयाला उलटवणाऱ्या सात न्यायमूर्तींच्या घटनापीठाचा भाग होते, ज्यामुळे विद्यापीठाला संस्थेच्या अल्पसंख्याक दर्जाचा पुनर्विचार करण्याचा मार्ग मोकळा झाला.

ते पेगासस स्पायवेअर प्रकरणाची सुनावणी करणाऱ्या खंडपीठाचा भाग होते, ज्याने बेकायदेशीर पाळत ठेवण्याच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी सायबर तज्ञांचे एक पॅनेल तयार केले होते. त्यांनी असेही म्हटले की राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली स्वातंत्र्य दिले जाऊ शकत नाही.

बिहार एसआयआर प्रकरणाचीही सुनावणी केली

न्यायाधीश सूर्यकांत यांनी बिहारमधील एसआयआरशी संबंधित एका प्रकरणाचीही सुनावणी केली. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेवर भर देत, न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी निवडणूक आयोगाला बिहारमधील विशेष सघन पुनरावृत्तीनंतर मसुदा मतदार यादीतून वगळलेल्या ६५ लाख नावांची माहिती सार्वजनिक करण्याचे निर्देश दिले.

## मुंबईतील घाटकोपर रेल्वे स्टेशनजवळील इमारतीला आग; धुराच्या लोटातून २०० जणांची सुटका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : घाटकोपर रेल्वे स्थानकानजीक असलेल्या रविशा टॉवर या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर सायंकाळच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली. येथील ही इमारत कमर्शियल टॉवर आहे, त्यामुळे इमारतीमध्ये मोठ्या प्रमाणात कर्मचारी होते, तसेच इमारतीच्या खाली दुचाकी व चारचाकी गाड्यांची पार्किंग देखील होती. आगीची घटना घडलयानंतर घटनास्थळी अजून अग्निशमन दलाची गाडी येण्यास विलंब झाला होता. त्यामुळे, इमारतीमध्ये अडकलेले लोक घाबरुन गेल्याचं पाहायला मिळालं.

घाटकोपर रेल्वे स्थानक नजीक असलेल्या रविशा टॉवर या १३ मजली इमारतीच्या पहिल्या मजल्यावर भीषण आग लागली होती.

या कर्मशियल इमारतीमध्ये दोनशेपेक्षा जास्त लोक अडकले होते. मात्र, अग्निशमन दलाच्या जवानांनी सर्वांना सुखरुप बाहेर काढल्याने त्यांचा जीव भांड्यात पडला.

सध्या आगीवर नियंत्रण मिळविण्यात अग्निशमन दलास यश आले असून इमारतीमधील १३ व्या मजल्याचे काही प्रमाणात नुकसान झाले आहे.

सदर इमारत ही पूर्णपणे काचांनी बंदिस्त असल्याने आग आतमध्ये धुमसत होती. तसेच, धुराचे लोटही मोठ्या प्रमाणात आतमध्ये पसरल्याचं दिसून आलं.

साधारण २०० ते ३०० लोकांना या इमारतीमधून बाहेर काढण्यात आलं आहे. मजल्यावर मोठ्या प्रमाणात धूर असल्याने अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढण्यात अडथळा निर्माण होत होता.

## संपादकीय....

### पाऊस पाठ सोडेना

दिवाळी झाल्यानंतरही पाऊस मागे हटण्याचं नाव घेत नसल्याने शेतकरी वर्ग ही मेटाकुटीला आला आहे. इतकंच नाही तर कोकणाची मोठी अर्थव्यवस्था अवलंबून असते ती आंबा आणि काजू बागांवरती. आंबा बागायतदारही पाऊस लांबल्याने धास्तावला आहे. आंब्याला येणारा मोहोर पुढे जाण्याची भीती आहे. पाऊस पडल्याने पुन्हा एकदा आंब्याला पालवी फुटण्याचा धोका आहे, त्यामुळे यंदाचा आंबा हंगाम लांबण्याची भीती आंबा बागायतदारांकडून व्यक्त होत आहे.कोकणात दिवाळीपासून पुन्हा एकदा पावसाने दररोज संध्याकाळी जोरदार हजेरी लावली आहे. समुद्रामध्येही वादळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या पावसाने कोकणात शेतकरी आणि मच्छीवारांचंही नुकसान झालं आहे. आता पुन्हा एकदा मुंबई प्रादेशिक हवामान विभागाकडून रत्नागिरी जिल्ह्यासाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. २७ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर या दोन दिवसांच्या कालावधीसाठी यलो अलर्ट देण्यात आला आहे. या कालावधीत जिल्ह्यातील काही भागात मेघगर्जनेसह, वादळी वाऱ्यासह पर्जन्यमान होण्याची शक्यता वर्तवण्यात आलेली आहे. यामुळे रत्नागिरी जिल्हा प्रशासनही अलर्ट मोडवर आहे. जिल्हा प्रशासनाकडून आपत्कालीन विभागाचे फोननंबर जारी करण्यात आले आहेत. मुंबई प्रादेशिक हवामान विभागाकडून माहितीनुसार, रत्नागिरी जिल्ह्यात २९ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत यलो अलर्ट देण्यात आला आहे. या कालावधीत जिल्ह्यातील काही भागात मेघगर्जनेसह आणि वादळीवाऱ्यासह पाऊस होण्याची शक्यता वर्तवण्यात आलेली आहे. या कालावधीत विजा चमकत असताना खबरदारीच्या उपाययोजना कराव्यात, असं आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आलं आहे. अरबी समुद्रात निर्माण झालेल्या तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रामुळे व मध्य पूर्व अरबी समुद्रापासून पश्चिम मध्य प्रदेशापर्यंत ढगांची द्रोणीय स्थिती निर्माण झाल्याने राज्यात सर्वत्र पाऊस पडत आहे. त्यामुळे बंगालच्या उपसागरात निर्माण झालेलं चक्रीवादळ अधिक तीव्र होऊ शकते. दरम्यान, पुणे शहराच्या मध्यवर्ती भागापासून, उपनगर व जिल्ह्यात रविवारी दुपारनंतर पावसाने जोरदार हजेरी लावली. ढगांच्या गडगडाटासह बरसलेल्या पावसामुळे काही वेळासाठी रस्ते जलमय झाले होते. सुट्टी असल्यामुळे कामासाठी बाहेर पडलेल्या नागरिकांची अचानक आलेल्या पावसाने धांदल उडाली. राज्यातील १५ जिल्ह्यात पावसाचा अंदाज वर्तवण्यात आल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. यंदा सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाल्याने धरणे तुडुंब भरली असली तरीही शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे.

# लोकनाट्य तमाशा हे आंबेडकरवादी समाजाची सामाजिक संस्कृतीच...!





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गण, गौळण व पोवाडातून सांगतात बाबासाहेब

**महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे रुजवतात विचार : प्रा. मुन्नाभाई नंदागवळी**

माणूस जन्माला आला की त्याला हक्क, अधिकार या गोष्टी आवश्यक असतात. तसेच सांस्कृतिक, सामाजिक, कला आदी क्षेत्रात माणूस विरंगुळा आणि समाजप्रबोधन यामध्ये वावरत असतो. १९६० पासून दलित साहित्य निर्माण झाले. व १९९० पासून दलितचे आंबेडकरवादी साहित्य नामकरण झाले. याचाच भाग तमाशा लोकनाट्य आहे. तमाशा मर्दाचा अशी आदीपासूनच एक म्हण रुढ झाली आहे. समाजप्रबोधन आला की महापुरुषांचे विचार जनमाणसात रुजवावे लागतात. यासंदर्भाने लोकनाट्य तमाशातून ज्ञानसूर्य, महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे विचार जनमानसात पेरले जातात व समाजप्रबोधन घडवून आणतात. म्हणून लोकनाट्य तमाशा हे आंबेडकरवादी समाजाची सामाजिक संस्कृतीच...!

झाडीपट्टी असो किंवा विदर्भ या मातीत अनेक नामवंत कलावंत घडले आहेत. या मातीने हौशी कलावंतांपासून तर चित्रपटसृष्टीतील कलाकार घडविले आहेत. अनेकांना गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत नेण्याचे काम या कलावंतांपासून प्राप्त झाले आहे. खरा कलाकार हा लोकनाट्य व लोककलेमुळे निर्माण झाला आहे. यातून कलाकारांना मोठे यश गाठता आले म्हणूनच ग्रामीण भागातूनच लोकनाट्य व लोककलेचा कलावंत हा तमाशा या प्रकाराचा मोठा नामवंत कलाकार घडला व तमाशा अजरामर झाला.

**विचार पेरण्याची प्रेरणा 'बाबासाहेब आंबेडकर'**

डॉ बाबासाहेब आंबेडकर हे जन्मापासून अत्यंत हुशार व चाणाक्ष होते. अभ्यासाचा करण्याचा जसा छंद तसा त्यांना संगीताची आवड होती. ते उत्तम हार्मोनियम व तबलावादक होते. ते एकदा वामनदादा कर्डक यांना म्हणाले- माझी दहा भाषणे तर तुमचा एक संगीत जलसा हे बरोबरीचे आहे.म्हणून यामधून विचार पेरण्यासाठी आंबेडकरवादी समाजात जलसा, तमाशा, कव्वाली व समाजप्रबोधन कार्यक्रम प्रामुख्याने होतात. हे संस्कार व प्रेरणा आहे.

**तमाशातून समाजाचा विचार जगतोय**

महाराष्ट्रातील प्रसिद्ध लोककलेत तमाशाचा उल्लेख करावा लागतो. गायन, वादन, नृत्य आणि विनोद यांचा परिपोष असलेली ही लोककला आहे. तमाशा हा मूळ शब्द अरबी आहे. त्याचा अर्थ दृश्य, खेळ किंवा नाट्यप्रयोग असा आहे. या खेळात गण- गौळण, रंगबाजी आणि वग अशा तीन प्रकारच्या नाट्यांनी रंगत येत असते. त्यानंतर तमाशातील स्त्रियांचे नृत्य होते. त्यानंतर गौळण. रंगबाजी म्हणजे रंगमंचावर होणारे श्रृंगारीक सादरीकरण होतात. यामध्ये आता गेल्या काही वर्षांपासून महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा गण, गौळण व गीत सादर केले जातात.



**पोवाळातून दिली जाते मानवंदना**

धार्मिक आणि नैतिक तत्त्वज्ञान सांगणारी लोककला म्हणजे तमाशा होय. काही दशकापासून आंबेडकरवादी समाजातील कवी, गीतकार हे बौद्ध समाजातील प्रसंग, नवा जागृतीचा भाग म्हणून गीत, कवीता गझल असे साहित्य प्रकार लिहीत आहे. तसेच पोवाळा निर्माण करुन ते तमाशा समाजप्रबोधन कार्यक्रमातून रसिकांच्या समोर बाबासाहेब आंबेडकरांचे पोवाडे सादरीकरण करतात आणि मानवंदना देतात.

**संत व महापुरुषांचे गुणगान**

डॉ बाबासाहेब आंबेडकरांप्रमाणेच संत तुकाराम, संत चोखामेळा, कर्ममेळा, माता जिजाबाई, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, माता रमाई आदीचे गुणगान केले जाते. ही समाजासाठी प्रेरणादायी कार्य आहे. कारण आंबेडकरी समाज हा सत्य आणि मानवतावादी विचारांचा पुरस्कार करणारा समाज आहे. महापुरुषांचे विचार आणि गीत हे सादरीकरण करुन समाजाला नवी दिशा वा प्रेरणा देण्याचे कार्य आंबेडकरवादी समाजातील कलावंत करतात. ही मोठे जिकरीचे काम आहे.

**(लेखक हे आंबेडकरवादी साहित्याचे अभ्यासक आहेत.)**

**स्वरकाव्य निवास येरंडी-**
**बाराभाटी, त. अर्जुनीमोरगाव, जि. गोंदिया**
**संवाद : ९७६४६७६४९९**

# शासनकर्ती जमात : स्वाभिमानाचा प्रवास आणि संघर्षाचा संकल्प

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारतात आज प्रत्येक घटक सत्तेच्या केंद्रात पोहोचण्याची आकांक्षा बाळगतो. पण शासनकर्ती जमात बनणे म्हणजे केवळ निवडणुकीत जिंकणे नाही, तर विचाराने, संघटनाने आणि आत्मभानाने समाजाला दिशा देणे होय. केवळ संख्या नाही, तर सामर्थ्य, एकजूट आणि जागृती हाच खरा सत्तेचा पाया आहे. कारण संख्येने मोठे असणे पुरेसे नाही, विचाराने, संघटनेने आणि कृतीने सक्षम बनल्याशिवाय सत्ता हातात येत नाही. अंतर्गत मतभेद आणि उपगटवाद जे थांबवतात प्रवास. आपला समाज उपजतच विभागला गेला आहे. जात, पंथ, संस्था आणि अहंकार यांच्या भिंतींनी. आपण सारे एक ही भावना अजूनही कृतीत उतरलेली नाही. नेतृत्वाचा अभाव आणि सत्तालालसा मुळे खरे लोकनेते मागे पडतात, संधीसाधू पुढे येतात. नेतृत्व ही जबाबदारी नव्हे तर प्रतिष्ठेची जागा बनली आहे. जनतेचा विश्वास या स्वार्थी खेळांमुळे हरवत चालला आहे. शिक्षण आणि अर्थव्यवस्थेतील कमजोरीमुळे शासन हे ज्ञानावर आणि संपन्नतेवर उभे असते. शिक्षणाचा प्रकाश आणि आर्थिक स्वावलंबन हेच सत्तेचे खरे शस्त्र आहेत. जे आजही अनेकांना न मिळाल्याने समाज निर्णयक्षम होत नाही. धर्म, भाषा, प्रांत आणि जातीच्या नावाखाली समाजात फूट पाडली जाते. एकजूट मोडली की सत्ता हातातून निसटते. आपण सत्तेसाठी जन्मलो नाही ही मानसिक गुलामी अजूनही टिकून आहे. स्वतःच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवला नाही तर इतर आपल्या भविष्यावर नियंत्रण ठेवतील.




डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या त्रिसूत्रीची आज सर्वाधिक गरज आहे. शिका, संघटित व्हा, संघर्ष करा. विचारशक्ती आणि विवेक विकसित केला तर कोणताही समाज झुकत नाही. सत्ता टिकवायची असेल तर आर्थिक स्वातंत्र्य अनिवार्य आहे. उद्यमशीलता, तंत्रज्ञान आणि व्यवसाय यात सहभाग वाढवावे लागेल. वैयक्तिक महत्वाकांक्षा बाजूला ठेवा. सामूहिक विचार, सामूहिक निर्णय आणि सामूहिक नेतृत्व यांवर भर द्यावे लागेल. प्रत्येक गल्लीत, प्रत्येक गावात संघटनाचे बी पेरा. वाचनसंस्कृती, संवाद आणि बौद्धिक प्रबोधन वाढवावे लागेल. आपल्यात नेतृत्व करण्याची क्षमता आहे, हे प्रत्येकाने जाणले पाहिजे. आत्मसन्मानाचा जाज्वल्य भाव निर्माण झाला की सत्ता आपोआप आकर्षित होते.

शासनकर्ती जमात होणे हा प्रवास एका पिढीचा नाही, तर शतकांचा संघर्ष आहे. पण या संघर्षात जर आपण विचार, संघटन आणि आर्थिक बळ या त्रिसूत्रीला स्वीकारले, तर तो दिवस दूर नाही, जेव्हा आपण केवळ मतदार नव्हे, तर सत्ताधारी आणि निर्णयकर्ते म्हणून इतिहास लिहू.

**– प्रवीण बागड़े**
**नागपूर**
**मो.क्र. ९९२३६ २०९१९**

# विश्वप्रणेता डॉ. बाबासाहेब आंबेडकर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सहा डिसेंबर २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण एकोनसत्तर वर्षे पूर्ण होत आहे. डॉ. बाबासाहेब यांना जाऊन जरी प्रदीर्घ कालावधी झाला असला तरी, त्यांचा विचार अद्यापही जाज्वल्य, ज्वलंत व प्रेरणादायी आहे. नव्हे तर एकविसाव्या शतकात डॉक्टर बाबासाहेब हे जगाचे विश्वप्रणेते बनले आहेत. 'दि क्रियेटर ऑफ द युनिव्हर्स'; 'वर्ल्ड साइन ऑफ इक्विलिटी'; आणि 'सिम्बॉल ऑफ नॉलेज' ही प्रतिके त्यांना दिली जात आहेत. डॉ. बाबासाहेब यांचे नंतर त्यांनी दिलेला वैश्विक विचार समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय ही मानवी मूल्ये यांची मांडणी जगाने स्वीकारली आहे. यामुळेच डॉ. बाबासाहेब हे संपूर्ण जगाचे विश्वप्रणेते ठरले आहेत. विशेष करून ते भारताचे सामाजिक योद्धा म्हणून गणले गेले. या पार्श्वभूमीवर लेखकाची डॉ बाबासाहेबांच्या विविध पैलूंवर एकूण २६ ग्रंथ, सुमारे १२५ लेख प्रकाशित झाली. आगामी चार पुस्तके प्रकाशनाधिन आहेत. तथापि. प्रस्तुत लेखात, डॉ. बाबासाहेबांच्या संपूर्ण जीवनावर वास्तववादी दृष्टिकोनातून माहितीचे सादरीकरण करण्याचा प्रपंच आहे.

विशेष म्हणजे, १४ एप्रिल १९९० रोजी 'भारतरत्न' हा भारताचा सर्वात श्रेष्ठ दर्जाचा बहुमान दिला गेला. भारताचे राष्ट्रपती आयुष्यमान आर. व्यंकटरमण यांनी हे पदक डॉ आंबेडकरांच्या पत्नी सविता आंबेडकर यांना सुपूर्द केला होता. तो क्षण अतिशय अवस्मिर्णिय व अभिमानाचा ठरला होता. परंतु आत्ता डॉ. बाबासाहेब हे संपूर्ण जगाचे निर्माते म्हणून त्यांची प्रतिमा पुढे आलेली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संपूर्ण ग्रंथसंपदांवरून, त्यांच्या सन १९३६ च्या 'अनहिलेशन ऑफ कास्ट' पासून ते १९५६ च्या 'बुद्ध अँड हीस धम्मा' पर्यंत सिंहावलोकन केले, तर बाबासाहेब हे प्रत्येक ग्रंथात व पृष्ठांवर समता, स्वातंत्र्य, सहानुभूती आणि सामाजिक न्याय या तत्त्वाची रचना व मांडणी करताना दिसतात. शिवाय डॉ. आंबेडकरांनी भारतीय संविधानामध्ये या मानवी मूल्यांची पखरण त्यांनी केली आहे. तथापि, शिवाय प्रज्ञा,शील, करुणा, दान पारमिता, आष्टांगमार्ग, कार्यकारणभाव आणि अनित्यता या सिद्धांताची मांडणी केली ही दिसून येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही आता व्यक्ती राहिली नसून त्यांचा विचार एक विश्वविचार ठरला आहे. व्यक्ती म्हणून त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्व समोर आले भारतीय घटनेचे शिल्पकार ठरले एक दृष्टीने ते थोर समाज सुधारक विद्वान वंचितांचे उद्धारकर्ते, प्रभावशाली वक्ते, कुशल संसदपटू, कायदेतज्ञ, एक नामवंत लेखक, व ग्रंथकार म्हणून व आत्ता संपूर्ण जगाचे विश्व प्रणेते अशी त्यांची ओळख महत्त्वाची व उल्लेखनीय आहे. याची नोंद जगाच्या इतिहासामध्ये व्हायला हवी. जेव्हा जेव्हा समता- स्वातंत्र्य- बंधुतेचा इतिहास लिहिला जाईल, तेव्हा तेव्हा डॉ. बाबासाहेबांचे नाव अग्रक्रमाने कोरण्यात येईल. यात शंका नाही.

सध्या, २१ व्या शतकामध्ये बाबासाहेबांचा व्यक्तिमत्व व कर्तुत्वामुळे सर्व भारतीयांच्या व जगातील नागरिकांच्या मनात भारताचे सुपुत्र विषयी मनात आदर व प्रेमाचे स्थान निर्माण झाले आहे. जगातील संस्था व संघटना या सामाजिक न्याय आणि समता प्रस्थापित करण्यासाठी अनेक चळवळी निर्माण झाल्या आहेत. सामाजिक समता, हक्क व अधिकार यांचे प्रतीक म्हणून त्यांना मानले जात आहे. अलिकडे, त्याना 'सिम्बॉलऑफनॉलेज' म्हणजे 'ज्ञानाचे प्रतिक' म्हणून देश विदेशातील विद्यार्थ्यांनी त्याला प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून अनुयायी अथवा फॉलोवर्स म्हणून घेण्यात धन्यता मानत आहेत. देखील अनेक जगातील अनेक विश्वविद्याये, महाविद्यालय, व शाळांमधून स्वीकारले गेले आहे. त्यांचे नावाने अनेक संस्था, संग्रहालय, स्मारके, सांस्कृतिक केंद्र, व ग्रंथालये उभारली गेली आहेत. यामुळे बाबासाहेबांचे चरित्र, कर्तुत्व व एकूनच परिवर्तन हे विचारात लक्षणीय उल्लेखनीय व महत्त्वाचे आणि प्रेरणादायी आहे.

सुभेदार रामजी मालोजी सकपाळ हे डॉ. भीमराव आंबेडकर यांचे वडील होते. मालोजी सकपाळ यांचे मूळ घराणे रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यात अंबडवे हे त्यांचे गाव. ते ब्रिटिश सैन्यात शिक्षक होते. त्यांनी १४ वर्षे मुख्याध्यापकाचे काम केले होते. त्यानंतर ते सुभेदार मेजर उद्यापर्यंत पोहोचले. लष्करी छावणीतच भारतातील महु येथे असताना रामजी व भिमाबाई या दापत्याला चौदावे अपत्य डॉ. भीमराव आंबेडकर हे झाले. रामजी कबीर भक्त होते भीमरावांच्या बालपणावर त्यांनी शिक्षण, स्वंयशिस्त, स्वावलंबन, स्वाभिमान व कठोर परिश्रम या गुणांचे महत्त्व पुन्हा पुन्हा सांगून बिंबवले होते. यामुळेच भिमराव पुढे देशाचे व जगाचे नेते म्हणून लौकिक प्राप्त केला आहे.

सातारा येथील शासकीय हायस्कूलच्या दप्तरांतील नोंदींप्रमाणे, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचा जन्मतारीख १४ एप्रिल १८९१ अशी असल्याचे वाचनात येते. यामुळे '१४ एप्रिल' हा दिवस जयंती दिवस म्हणून साजरा केला जातो. बाबासाहेबांनी आपल्या वडीला विषयी असे म्हटले आहे की, आम्हांमध्ये विद्येची अभिरुची उत्पन्न व्हावी, आमची चारित्र्य सोज्वळ बनावे, यासाठी आमचे वडील अतिशय दक्ष असत रामजी सकपाळ मिलिटरी मध्ये सुभेदार असल्याने, अतिशय काटकसर, नियम व अटी, स्वभावात शांतता व स्थैर्य, इतरांना समन्वय व सहकार्याची भावना बाळगणारे होते. सुभेदारांनी आपल्या मुलांना उत्तम दर्जाचे शिक्षण मिळावे या हेतूने त्यांनी सातारा सोडून मुंबई गाठली.

पुढे बाबासाहेबांच्या आयुष्यात महात्मा ज्योतिराव फुले; छत्रपती शाहू महाराज; बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड आणि कृष्णाजी केशव आंबेडकर गुरुजी हे त्यांचे मार्गदर्शक ठरले.

सन १९०७, आंबेडकर मॅट्रिक झाले. वाचनाची आवड निर्माण झाली. ३ जानेवारी १९०८ रोजी त्यांनी एल्फिन्स्टन महाविद्यालयात प्रवेश घेतला. सन १९१३ साली त्यांनी बी.ए. झाल्याची पदवी प्राप्त केली. पुढे बाबासाहेब हे अर्थशास्त्र कायदा संविधान या विषयातले तज्ञ म्हणून नावाजले गेले.

त्यावेळी भीमरावांची घरची अतिशय प्रतिकूल आर्थिक परिस्थिती होती त्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेणे जड जाऊ लागले तेव्हा कृष्णाजी अर्जुन केळुस्कर गुरुजी व निर्णय सागर छापखान्याचे मालक दामोदर सावळाराम यंदे यांच्या मध्यस्थीने व प्रयत्नाने बडोद्याचे राजे सयाजीराव गायकवाड यांच्याकडून एप्रिल १९११ मध्ये दरमहा रुपये २५/- इतकी शिष्यवृत्ती मिळाल्याची हुजूर ऑर्डर पाहावयास मिळते. दिनांक २४ एप्रिल १९१३ रोजी सयाजीराव महाराजांनी शिवलाल जयराम यांच्या मृत्यूमुळे रिक्त झालेल्या बडोदा विधिमंडळातील जागेवर अतिरिक्त सदस्य म्हणून भीमरावांचे नेमणूक केली होती असे बडोदा दत्तरातील नोंदीवरून दिसून येते परंतु डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला जायच्या तयारीत होते.

डॉक्टर आंबेडकर सन १९१३-१९१६ या तीन वर्षासाठी अर्थशास्त्र व समाजशास्त्र इतिहास तत्वज्ञान मानवशास्त्र आणि राज्यशास्त्र हे विषय घेऊन कोलंबिया विद्यापीठात प्रवेश घेतला पदवीसाठी त्यांनी १५ मे १९१५ रोजी... ऍडमिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ द ईस्ट इंडिया कंपनी... हा प्रबंध कोलंबिया विद्यापीठात सादर केला त्यानंतर द नॅशनल डिव्हिडंट ऑफ इंडिया हिस्टॉरिकल अँड ऍनालिटिकल स्टडी हा प्रबंध त्यांनी पीएचडीसाठी त्याच विद्यापीठामध्ये सण १९१६ ला सादर केला हा प्रबंध देऊलेशन ऑफ द प्रोविन्शियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया ए स्टडी इन द प्रोविन्शियल बी सेंट्रलायझेशन ऑफ इम्पेरियल फायनान्स या नावाने लंडनच्या पीएसके अँड कंपनी या प्रकाशकाने सन १९२५ पुस्तक रूपाने प्रकाशित केला दिनांक ८ जून १९२७ रोजी आंबेडकरांना डॉक्टरेट जाहीर करण्यात आली.

कोलंबिया विद्यापीठात शिक्षण ऑटोपून डॉ. आंबेडकरांनी लंडनमधील लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स या संस्थेत अर्थशास्त्राच्या अभ्यासासाठी प्रवेश घेतला होता. त्याचवेळी कायद्याचा अभ्यास 'बार-ट- लॉ' करण्यासाठी ऑक्टोबर १९१६ मध्ये 'ग्रेज इन' या संस्थेत प्रवेश घेतला.

दिनांक ११ ऑक्टोबर १९१८ रोजी डॉक्टर आंबेडकरांची मुंबई मधील सिडनहॅम कॉलेजमध्ये अर्थशास्त्राची हंगामी प्राध्यापक म्हणून नेमणूक झाल्याचेही वाचायला मिळते. याच काळात २१ ते २२ मार्च १९२० रोजी कोल्हापूर संस्थानातील माणगाव येथे शाहू महाराजांच्या प्रेरणेने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे अध्यक्षतेखाली महाराष्ट्रातील बहिष्कृत वर्गाची परिषद भरली होती ही आंबेडकर चळवळीची मुहूर्तमेढ रोवणारी पहिली जाहीर परिषद होय. या परिषदेत बोलताना शाहू महाराज म्हणाले होते की माझी खात्री आहे की, 'डॉ. आंबेडकर हे तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत आणि अशी एक वेळ येईल की ते सर्व हिंदुस्तानचे पुढारी होते'. पुढे महाराजांच्या मदतीने बाबासाहेब आंबेडकरांनी ३१ जानेवारी १९२० रोजी मूकनायक नावाचे नियतकालिक सुरू केले होते. डॉ. आंबेडकर यांना शाहू महाराजांनी आर्थिक मदत केल्याचे दिसून येते.

त्यांच्या सहकार्यानेच डॉ. आंबेडकरांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स या संस्थेत बी प्रॉब्लेम ऑफ दुरुपी हा प्रबंध सादर केला होता या प्रबंधाचा निर्णय होण्यास पाच सहा महिन्याचा अवधी लागणार असल्याने त्यांनी जर्मनीतील बॉण्ड विद्यापीठात प्रवेश घेतला आपल्या नियोजित ग्रंथ प्रबंधाची तयारी करत असतानाच त्यांना त्यांचे प्रोफेसर एडमिन कॅनन यांचे पत्र आले की समितीतील सभासद प्रबंध मंजूर करायला तयार नाहीत त्यामुळे डॉक्टर आंबेडकर फेब्रुवारी १९२३ मध्ये लंडनला परत गेले २३ ऑगस्ट १९२३ रोजी ते 'प्रॉब्लेम ऑफ द रुपी' या आपल्या प्रबंधात दुरुस्त्या करून डॉक्टर आंबेडकरांनी तो पुन्हा लंडन विद्यापीठाकडे पाठविला आणि त्यासाठी त्यांना डीएससी पदवी प्राप्त झाली. ते वर्ष होते नोव्हेंबर १९२३.

काही दिवस डॉक्टर आंबेडकरांनी बॉम्बे हायकोर्ट मध्ये देखील वकिली केल्याचे दिसून येते कारण त्यांनी बॉम्बे उच्च न्यायालयात वकिली ची सर्व मिळावी म्हणून २५ जून १९२३ रोजी एक अर्ज केलेला त्यांच्या चरित्रात वाचावयास मिळते. त्याप्रमाणे आंबेडकरांनी पाच जुलै १९२३ पर्यंत वकिली सुरू ठेवली होती.

त्यानंतर डॉक्टर बाबासाहेबांनी अस्पृश्य वर्गाच्या सामाजिक राजकीय अडचणी सरकार पुढे मांडण्यासाठी त्यांनी एक बहिष्कृत हितकारणी सभेचा विचार केला व २० जुलै १९२४ रोजी बहिष्कृत हितकारणी सभा स्थापन केली. या सभेचे उदिष्ट विद्यार्थी वस्तीग्रह उघडणे, बहिष्कृत समाजात शिक्षणाचा प्रचार करणे, बहिष्कृत समाजात उच्च शिक्षणा संस्कृतीची वाढ करण्यासाठी ठिकठिकाणी वाचनालय, वर्ग, अथवा स्वाध्याय संघ उघडणे आणि बहिष्कृत समाजाची संपत्ती स्थिती सुधारण्यासाठी औद्योगिक व शेतकी विषयक शाळा चालवणे अशी उद्दिष्टे निश्चित केली गेली होती.

कालानुक्रमानुसार, डॉ. आंबेडकरांनी १ जानेवारी १९२७ रोजी भीमा कोरेगाव येथील विजय स्तंभाला भेट दिल्याचे वाचाव यास मिळते १८१८ मध्ये ब्रिटिश व पेशवे यांच्यात निर्णायक लढाई झाली होती त्यात पेशव्यांचा पराभव झाला होता. पेशवाई बुडाली. ब्रिटिशांच्या बाजूने लढणाऱ्या सैनिकात प्रामुख्याने महार बटालियनचे सैनिक होते.ह त्यांच्या शौर्याचे प्रतीक म्हणून विजयस्तंभ बांधला गेला. एक इतिहास निर्माण झाला. तो आपण आता विसरू शकत नाही.

**– क्रमश:**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या चिन्हावर निवडणूक लढवणार : जिल्हाध्यक्ष उमेश पाटील

## करमाळा येथे मुलाखतीसह घेतला आढावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : करमाळा तालुक्यातील जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुका राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्षप्रमुख उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली माजी आमदार संजय मामा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेसच्या चिन्हावर लढवणार असून महायुतीच्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुका संदर्भात आढावा बैठकीच्या मुलाखती करमाळा येथे संपन्न झाल्या. यावेळी अजित दादा पवार सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी माजी आमदार संजय मामा



शिंदे यांचा संपर्क कार्यालय येथे करमाळा तालुक्यातील जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या मुलाखती घेण्यात आल्या यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस करमाळा तालुका अध्यक्ष भारत भाऊ अवताडे, व युवक काँग्रेस प्रदेश सरचिटणीस अजिंक्य पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस युवक जिल्हाध्यक्ष अभिषेक आव्हाड, युवक तालुका अध्यक्ष किरण फुंदे, माजी तालुकाध्यक्ष हनुमंत पांढरे पाटील, कार्याध्यक्ष सुजित तात्या बागल, तालुका प्रवक्ते अँड अजित विघ्ने, डॉक्टर गोरख गुळवे, प्रदीप सदस्य बाळकृष्ण सोनवणे तालुका उपाध्यक्ष अमोल फरतडे, सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकारी सदस्य चंद्रकांत काका सरडे, जिल्हा उपाध्यक्ष अशपाक जमादार,उद्योगाकडे तालुकाध्यक्ष प्रसाद जगताप लेबर फाउंडेशन संचालक मानसिंग खंडागळे तरडगाव निंबाजी सरपंच अभिजीत पाटील इत्यादी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तब्बल २५ वर्षांनी जुन्या आठवणींना उजाळा: माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : उमरगा तालुक्यातील येळी येथील भाऊसाहेब बिराजदार स्मारक विद्यालय दहावीच्या १९९९ च्या बॅचचा माजी विद्यार्थी मेळावा नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. तब्बल २५ वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर वर्गमित्र एकत्र आल्याने मेळाव्याचे वातावरण भावूक आणि आनंदी झाले होते.

मेळाव्याची सुरुवात दीपप्रज्वलनाने आणि सरस्वतीच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक गुरुलिंग वाकडे, गोविंद देवणे, अजय कुंभार, सतीश पटवारी, बालाजी आंबेकर, गवारे, लिंबाळकर यांनी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला आणि



विद्यार्थ्यांनी आयुष्यात केलेल्या प्रगतीबद्दल कौतुक केले.

माजी विद्यार्थ्यांनी यावेळी आपल्या शालेय जीवनातील गमतीशीर किस्से सांगितले. एकमेकांना पाहताच अनेकांनी जुन्या मित्रांना मिठी मारली आणि बालपणीच्या आठवणीत रमून गेले. यावेळी काही विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन गायन, नृत्याचे सादरीकरण केले, ज्यामुळे कार्यक्रमाला अधिक रंगत आली.

# ओवी मोगलची राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्र शासन अंतर्गत विभागीय शालेय बुद्धिबळ स्पर्धा नुकत्याच जळगाव येथे संपन्न झाल्या यावेळी मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालय कोठुरे विद्यालयाची विद्यार्थिनी ओवी मोगल हिने अंडर १४ या वयोगटात बुद्धिबळ स्पर्धेत विभागात द्वितीय क्रमांक पटकाविला तिने ६ पैकी ५ राऊंडमध्ये विजय मिळवीत आपले स्थान पुढे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निश्चित केले. तिला या खेळासाठी विशेष मार्गदर्शन. बुद्धिबळ प्रशिक्षक तिचे वडील अतुल मोगल यांचे लाभले असून व आई चे ही पाठबळ



मिळाले आहे, तिच्या यशाबद्दल. मविप्र संस्थेचे सरचिटणीस .नितीन जी ठाकरे, सभापती .बाळासाहेब क्षीरसागर, निफाड तालुका संचालक . शिवाजी पाटील गडाख, निफाड तालुका महिला संचालक शोभा बोरस्ते तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील सातपुते, ज्येष्ठ शिक्षक शिवाजीराव सानप नितीन सावकार, लहानु शिंदे (क्रीडाशिक्षक), सुयोग गीते, तुषार मोगल शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य ,सर्व शिक्षक बंधू-भगिनी शिक्षकेतर कर्मचारी आदींनी तिचे कौतुक केले व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कोठुरे पंचक्रोशीतून अभिनंदन केले जात आहे

# परिवहनमंत्री प्रताप सरनाईक, शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी घेतले श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी आज श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगांवकर यांनी परिवहन मंत्री श्री.सरनाईक व शालेय शिक्षण मंत्री श्री. भुसे यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला.

यावेळी माजी आमदार सिध्दाराम म्हेत्रे, खाजगी सचिव अनिकेत मानोरकर, मंदीर समितीचे



प्र. व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत, विभाग प्रमुख राजेंद्र सुभेदार तसेच मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

**परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली भक्ती सागर येथील केली पाहणी**

कार्तिकी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून तसेच परराज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक येतात. कार्तिकी शुध्द एकादशी रविवार दि. ०२ नोव्हेंबर, २०२५ रोजी असून, यात्रा कालावधीत ६५ एकर (भक्ती सागर), येथे मोठ्या प्रमाणावर दिंड्या तसेच वारकरी भाविक मुक्कामी असतात. या ठिकाणी प्रशासनाकडून उपलब्ध करण्यात येणाऱ्या सुविधाची पाहणी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली.

यावेळी त्यांच्या समवेत आमदार सिद्धाराम म्हेत्रे, अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, अप्पर उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे, प्रांताधिकारी सचिन इथापे, कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, संबधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

याप्रसंगी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ६५ एकर (भक्ती सागर), येथे भाविकांना स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छता, सुरक्षित विद्युत व्यवस्था, सुलभ शौचालय, प्रखर प्रकाश व्यवस्था, आरोग्य सुविधा उपलब्धते बाबत माहिती घेतली. तसेच आवश्यक ठिकाणी मुरमीकरण, रस्ते दुरुस्ती तात्काळ करावी अशा सुचना त्यांनी यावेळी दिल्या

# प्रत्येक विद्यार्थ्याकडे लॅपटॉप आणि डॉ. आंबेडकरांचे चरित्र असायला हवे : कुलगुरु डॉ. प्रकाश करमाडकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने नवीन शैक्षणिक धोरणाचे विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक आणि समाज जीवनावर होणारे परिणाम. या ज्वलंत प्रासंगिक विषयावर १४० वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा साकेत नगर येथील संस्थेच्या कार्यालयात २६ ऑक्टोबर २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, संपूर्ण देशात एकसमान एक शिक्षण एक अभ्यासक्रम राबविला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे इंग्रजी शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. याची जाणीव ठेवून आंतरराष्ट्रीय स्तरावरील दर्जेदार शिक्षण आपण प्राप्त केले पाहिजे. ज्याच्याकडे कौशल्यपूर्ण दर्जेदार शिक्षण आणि सेवा करण्याची

## १४० वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

प्रवृत्ती असेल त्यालाच या व्यवस्थेत टिकून राहता येईल. शिक्षण व्यवस्थेतून प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये मानवीय दृष्टिकोन विकसित झाला पाहिजे. जेणेकरून त्या शिक्षित माणसात शील आणि सौजन्य विकसित झाले तर समाजाला त्याची भीती वाटणार नाही.आपणास जे जे व्हावे असे वाटते, ते ते करून घेण्यासाठी आपण किंमत मोजली पाहिजे. जीवनाच्या विविध क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी प्रशिक्षित कार्यकर्ते निर्माण व्हावेत म्हणून डॉ. आंबेडकरांच्या अपेक्षेनुसार ट्रेनिंग स्कूल फॉर एंट्रन्स टू पॉलिटिक्स प्रमाणे प्रशिक्षण कार्यशाळा निरंतरपणे चालविल्या पाहिजेत. ही वर्तमान काळाची गरज लक्षात घेऊन अशा अनेक बाबी समजून घेऊन समजावून सांगण्यासाठी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनने सदरील विषयावर कार्यशाळा आयोजित केली.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्ते चेतना महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. अरुण कोळी म्हणाले की, जीवनात बदल कसा घडतो? याची प्रक्रिया भारताचे संविधानाच्या अंमलबजावणीतून पुढे येते. चळवळीच्या केंद्रबिंदू विद्यार्थी का बनत नाही? यावर आपण प्रकर्षाने विचार केला पाहिजे.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना त्रिपुरा येथील आर्यवत आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश करमाडकर म्हणाले की, ड्रायव्हर, लोहार, कुंभार, चांभार इत्यादींनी परंपरागत कामात गुंतून रहावे म्हणून त्यांना कौशल्य विकासाच्या नावावर तशा प्रकारचे शिक्षण देण्याची व्यवस्था नवीन शैक्षणिक धोरणात करण्यात आलेली आहे. कारण गावकुसा बाहेरील माणसे गावात आल्यामुळे व्यवस्थेच्या संचालकांना ते सहन होत नाही. आता आपण आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण घेण्यात अग्रेसर असायला हवे. बदलत्या काळात तांत्रिक शिक्षण घेऊन टेक्नोसेव्ही झाले पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्याकडे लॅपटॉप आणि डॉ. आंबेडकरांचे चरित्र असायला हवे. आता आपणाला वेगळ्या वळणाच्या वाटा निवडतांना कॉम्प्युटर इंडस्ट्री हस्तगत केल्या पाहिजेत.

याप्रसंगी डॉ. रमेशचंद्र धनेगावकर म्हणाले की, खाजगी शिक्षण संस्थात अप्रशिक्षित शिक्षकांकडून दर्जेदार शिक्षण दिले जात नाही. शिक्षणाचे व्यापारीकरण होत चालले आहे. भविष्याचा वेध घेणारी चिकित्सक शिक्षण व्यवस्था असायला हवी. प्रा. शिवम गायकवाड म्हणाले की, शिक्षणाच्या व्यापारीकरणात विद्यार्थी हा ग्राहक झाला आहे. प्रतीक पंचशील म्हणाले की, लॉर्ड मेकालेनी सर्वांना समान शिक्षण देण्याचे प्रयोजन करून चातुरवर्णाला छेद दिला. अशोक मेश्राम म्हणाले की, वंशपरंपरागत कामाला चालना देऊन



वर्ण व्यवस्था स्थापित करण्याचे षडयंत्र सुरू आहे. उद्योजक मिलिंद बागुल म्हणाले की, क्रांतीची ज्वाला एखादी व्यक्ती पेटवत असते. तसेच उद्योजक शशिकांत काळे, कृष्णा ऐवळे, अन्वय गायकवाड, साधू आनंद यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

सुरुवातीला आदर्शांना पुष्प व पुष्पमाला अर्पण करून फाउंडेशनच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन अॅड. विलास रामटेके तर प्रास्ताविक व आभार अॅड. राजू बागुल यांनी व्यक्त केले.

## आमदार दौलत दरोडा यांच्या कडून ठाणे जिल्हाधिकारी व शहापूर तहसीलदार यांना शेतकऱ्यांना तातडीची मदती करिता सूचना

# शहापूर तालुक्यात अवकाळी आणि लांबलेल्या पावसामुळे भात शेतीचे पूर्ण नुकसान..

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शहापूर/विजय घनघाव : शहापूर तालुका ठाणे जिल्ह्यातील डोंगराळ तालुका असून, येथील शेती मुख्यतः भात (धान) पिकावर अवलंबून आहे. भात हा कोकणातील प्रमुख पीक असून, खरीप हंगामात (जून-ऑक्टोबर) काढणीसाठी तयार होत असतो. मात्र, २०२५ मध्ये ऑक्टोबर महिन्यातील अवकाळी पाऊस आणि आणखीन लांबलेला पाऊस यामुळे भात शेती पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहे. यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती गंभीर झाली असून, लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

**नुकसानाची व्याप्ती आणि कारणे**

पूर्ण नुकसान: शहापूर तालुक्यातील भात शेतीचे ७०-१००% नुकसान झाले



आहे. काढणीस तयार असलेले भात पिके (लोम्बे) पावसामुळे पडले, कुजले आणि वाहून गेले. ओल्या वाऱ्याने आणि मुसळधार पावसाने शेतमाल भिजला, ज्यामुळे तो विक्रीयोग्य राहिला नाही. तालुक्यातील ५०,००० हेक्टरपेक्षा जास्त भात क्षेत्र प्रभावित झाले असावे, ज्यातील बहुतेक पूर्ण नुकसान आहे.

उदाहरण: २१ ऑक्टोबर आणि त्यानंतर सुद्धा रोजच्या पावसाने तालुक्यातील नद्या-ओढे फुलल्या, ज्यामुळे भात खोळे पाण्याने भरले. कापलेला भात शेतातच पडून भिजला, आणि उभे पिके मुळासकट निघाले आहेत.

**कारणे:** हवामान बदलामुळे लांबलेला मॉन्सून (जून-ऑक्टोबरपर्यंत अतिवृष्टी) आणि अचानक अवकाळी पाऊस. ठाणे जिल्ह्यात सरासरीपेक्षा २००% जास्त पाऊस नोंदला गेला, ज्याने भाताच्या काढणीस अडचण आली.

यासंदर्भात अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळण्याबाबत कार्यवाही करावी यासाठी शहापूर विधानसभा आमदार तथा अध्यक्ष अनुसूचित जमाती कल्याण समिती महाराष्ट्र राज्य राज्यमंत्री दर्जा श्री. दौलत दरोडा यांच्या वतीने मा. तहसीलदार श्री.परमेश्वर कासुळे यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी निवेदन देताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस श्री. संजय तिवरे, प्रदेश चिटणीस श्री. डी. के विशे सर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ठाणे ग्रामीण प्रभारी जिल्हा अध्यक्ष श्री.किसनराव तारमळे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शहापूर तालुका अध्यक्ष डॉ. श्री. मनोहर सासे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ कार्यकर्ते तथा विधानसभा क्षेत्र अध्यक्ष श्री.तुकाराम वेखंडे, तालुका कार्याध्यक्ष श्री. अरुण मांजे, .आदी उपस्थित होते.

तसेच आमदार दौलत दरोडा यांनी कळमगाव येथील शेतकऱ्यांच्या शेतामध्ये प्रत्यक्ष उतरून झालेल्या नुकसानीची पाहणी करून शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी अशा सूचना ठाणे जिल्हाधिकारी व शहापूर तहसीलदार यांना केल्या आहेत.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सिंदखेडराजा तालुका अध्यक्ष पदी सिध्दार्थ जाधव यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सिंदखेडराजा तालुका अध्यक्ष पदी सिध्दार्थ जाधव यांची निवड करण्यात आली आहे. सामाजिक, राजकीय बांधिलकी जोपासणारे मनमिळाऊ सर्वांना सोबत घेत चालणारे यांची सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचे आमदार मनोज भाऊ कायंदे यांच्या सुचनेनुसार बुलढाणा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा अध्यक्ष तथा महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे प्रांत अध्यक्ष.अँड. नाझेर काझी साहेब यांनी



सिंदखेडराजा कृषी उत्पन्न बाजार समिती चे संचालक सिध्दार्थ महेश राव जाधव यांची सिंदखेडराजा तालुका अध्यक्षपदी यांची निवड करण्यात आली. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या विचारानुसार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या माध्यमातून आपली एकनिष्ठता तसेच आपल्या आचरण विचारद्वरे समाजात पद प्रतिष्ठेची जपवणुक व जनसामान्यांचे प्रश्न सोडविण्यास आपण आग्रही रहाल आसे बुलढाणा जिल्ह्याचे अध्यक्ष अँड नाझेर काझी यांनी निवडी दरम्यान बोलताना सांगितले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या निवडीबद्दल सिंदखेडराजा तालुक्यात सिध्दार्थ जाधव यांना शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# भक्ती सागर, वाळवंट, पत्रा शेडची जिल्हाधिकाऱ्याकडून पाहणी

## कार्तिकी यात्रेची जय्यत तयारी; सोयी सुविधांचा घेतला आढावा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : कार्तिकी शुध्द एकादशी सोहळा दि. ०२ नोव्हेंबर २०२५ रोजी असून, या वारी सोहळ्यासाठी राज्यभरातून लाखो वारकरी भाविक येतात. या सोहळ्यासाठी येणाऱ्या प्रत्येक वारकरी भाविकाला आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात तसेच त्यांची कुठल्याही प्रकारची गैरसोय होऊ नये यासाठी प्रशासनाने व मंदीर समितीने केलेल्या सोयी-सुविधांची पाहणी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केली.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दर्शन रांगेत स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शौचालयाची संख्या वाढवणे तसेच त्यासाठी जादा स्वच्छता कर्मचारी उपलब्धता ठेवावी. नगरपालिका प्रशासनाने चंद्रभागा वाळवंट कायम स्वच्छ राहील याची दक्षता घेऊन नदीपात्रातील खड्डे बुजवावेत तसेच वाळवंट स्वच्छतेसाठी स्वतंत्र स्वच्छता कर्मचाऱ्यांचे पथक नेमावेत.

नदीपात्रात हायमास्ट दिव्यांसाठी जोडण्यात आलेली वीज जोडणी सुरक्षित ठेवण्यासाठी तात्काळ स्थलांतर करावे. शहरातील तसेच प्रदक्षिणा मार्गावरील अतिक्रमणे तात्काळ काढावीत, अनाधिकृत होर्डिंगवर कारवाई करावी अशा सूचना यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्या.

तसेच भक्तीसागर(६५ एकर), चंद्रभागा वाळवंट येथे वारकरी भाविकांसाठी प्रशासनाकडून देण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये शौचालय, पाणी पुरवठा, आरोग्य सुविधा, सुरक्षा व्यवस्था याबाबत माहिती घेतली त्याचबरोबर मंदिर समितीकडून पत्रा शेड, दर्शन रांगेत, करण्यात आलेल्या सुविधांची पाहणी केली

यावेळी त्यांच्या समवेत मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढगळे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, मुख्याधिकारी महेश रोकडे, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक दीपक धोत्रे, लेखाधिकारी मुकेश अनेचा यांच्यासह संबंधित विभागाचे विभागप्रमुख उपस्थित होते.

यावेळी मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी मंदीर समितीकडून वारकरी-भाविकांना देण्यात आलेल्या सुविधांची व श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदीराचे जतन संवर्धन आराखड्यातंर्गत सुरु असलेल्या कामांची माहिती दिली. तसेच मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी नगरपालिका प्रशासनाकडून ६५ एकर, वाळवंट व शहरात आरोग्याच्या दृष्टीने उपलब्ध सुविधा, अतिक्रमण मोहिम, शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्रकाश व्यवस्था आदीबाबत माहिती दिली.

# कर्मयोगी जीएनएम नर्सिंग महाविद्यालयाचा ८९.२८ टक्के निकाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य शिशुच्या व परावैदिक शिक्षण मंडळ मुंबई यांच्याकडून घेण्यात आलेल्या दुतीय वर्षाच्या अंतिम परीक्षेचा निकाल जाहीर झाला. असून या परीक्षेमध्ये श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचालित कर्मवीर इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग शेळवे महाविद्यालयाचा निकाल ८९.२८ इतका लागला असून यामध्ये प्रथम क्रमांक प्रतीक्षा लक्ष्मण सोनवणे ८६.७१%, तृतीय क्रमांक स्नेहा भारत पवार ८६.७१%, तृतीय क्रमांक पूजा तानाजी जाधव ८६. १४%



यांनी मिळवला आहे याबद्दल अधिक माहिती देताना नर्सिंग महाविद्यालयाची प्राचार्य प्रा. गुरुराज कुलकर्णी म्हणाले की कर्मयोगी जी एन एम नर्सिंग महाविद्यालयामध्ये द्वितीय वर्षाच्या प्राध्यापक वर्ग अत्याधुनिक समिनस या विद्यार्थ्यांकडून करून घेण्यात येणारा नियमित अभ्यास व शैक्षणिक लक्ष हेच या देशामध्ये गणक आहे असे म्हणून त्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक कर्मवीरिंग महाविद्यालयामध्ये प्राचार्य डॉक्टर एस बी पाटील कर्मवीर पॉलिटेक्निकल प्राचार्य डॉक्टर ए बी कणसे रजिस्टर गणेश वाळके कर्मवीर इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉक्टर एस एम जाधव तसेच सर्व प्राध्यापक यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# कुरुंद शेतकरी सेवा सोसायटी सभापतीपदी भगवान सांबरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

भिवंडी तालुक्यातील नावाजलेली शेतकरी सेवा सोसायटी समजल्या जाणाऱ्या कुरुंद शेतकरी सेवा सोसायटीच्या सभापतीपदी भगवान पांडुरंग सांबरे यांची बिनविरोध निवड झाली आहे. मागील सभापती उमेश ठाकरे यांनी आपापसामध्ये ठरल्याप्रमाणे आपल्या सभापती पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त जागेकरिता संचालक मंडळांमध्ये निवडणूक घेण्यात आली होती.यामध्ये सांबरे यांचा सभापती पदाकरिता एकमेव उमेदवारी अर्ज



दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. कुरुंद शेतकरी सेवा सोसायटीची सुमारे पाच कोटी रुपयांच्या आसपास वार्षिक उलाढाल आहे. भिवंडी तालुक्यातील १७ महसुली गावांचा समावेश यामध्ये होत आहे मात्र १९५९ साली स्थापन झालेल्या या शेतकरी सोसायटी मध्ये सभापती पद हे अद्यापही वाफाळे या गावाला मिळाले नव्हते. सांबरे यांच्या सभापती पदाच्या निवडीने तब्बल ५५ वर्षानंतर वाफाले गावाला हा मान मिळाला आहे. सभापतीपदी विराजमान होण्याचा मान वाफाळे गावाला मिळाल्याने सांबरे यांनी सर्व संचालकांचे आभारही मांडले. कुरुंद सोसायटी अंतर्गत शेतकऱ्यांकरिता नवीन भात खरेदी केंद्र सुरू करण्याचा आपला प्रयत्न आहे तसेच बी बियाणे, औषधे व शेतकी अवजारे शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात मिळवून देण्याकरिता आपण प्रयत्न करणार असल्याचे तसेच कुरुंद सेवा सोसायटी अधिकाधिक नफ्यात कशी येईल याकरिता आपण प्रयत्न करणार असल्याचे नवनिर्वाचित सभापती भगवान सांबरे यांच्याकडून सांगण्यात आले.

# शिवसेना (उबाठा) यांच्या वतीने कळंब नगर परिषदेला निवेदन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनीधी/सुधाकर रणदिवे : कळंब शहरातील नागरी सुविधांच्या अनुषंगाने नगर परिषद मुख्याधिकारी सौ. मंजूषा गुरमे यांना आमदार श्री कैलास दादा पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने निवेदन देण्यात आले.

२ नोव्हेंबर २०२५ पर्यंत खालील १ ते ५ मागण्या वर ठोस निर्णय घेत गांभीर्याने पाऊले न उचलल्यास नगर परिषदेवर धडक मोर्चा काढण्यात येईल असे नमुद केले.या निवेदनात खालील मागण्या आशा आहेत.

नगरोथ्थान महा अभियान अंतर्गत मंजूर पाणीपुरवठा योजनेचे काम तातडीने सुरु करावे, जूलै २०२१ मध्ये संजय मुंदडा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सर्वसाधारण बैठकीत झालेल्या ठरावानुसार सर्व्हे क्रं ७/ब मध्ये ईदगाह मैदानासाठी २ एकर जागा दिली असून भूमी अभिलेख कार्यालयाने मोजणी करून दिली आहे. सदर जागा विकसित करण्यासाठी मुस्लिम समाजाची समिती बनवून ईदगाह मैदान विकसित करण्यासाठी परवानगी देण्यात यावी,

पावसाळ्यात झालेली वाताहत पाहता अतिरिक्त कर्मचारी लावून कळंब शहर, रस्ते, गटारी स्वच्छता ची दोन सप्ताहाची मोहीम राबविण्यात यावी, पुनर्वसन सावरगाव हनुमान मंदिर व श्री व्यंकटेश बालाजी मंदिर च्या तिर्थक्षेत्र दर्जा समावेशासाठी पालिकेच्या यंत्रणेद्वारे संपूर्ण प्रशासकीय कार्यवाही व्हावी,

आमदार कैलास दादा पाटील यांच्या स्थानिक विकास निधीतून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व महाराणा प्रताप यांच्या शिल्प स्तंभ उभारणीसाठी ठराव व योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, सदर मागण्या बाबत २ नोव्हेंबर २०२५ पर्यंत गांभीर्याने पाऊले न उचलल्यास नगर परिषदेवर धडक मोर्चा काढण्यात येईल असे नमुद केले.निवेदन देण्यासाठी शिवसेना निवडणूक प्रभारी व माजी नगराध्यक्ष संजय मुंदडा, शहरप्रमुख विश्वजीत जाधव, सुधीर भवर, शामनाना खबाले, प्रा. संजय कांबळे, शंकर वाघमारे, संदीप बिदादा, मोहसीनदादा मिर्झा, इम्रान सय्यद, विठ्ठल समुद्रे, उत्रेश्वर बप्पा चोंदे, महेश पुरी, संघर्ष कांबळे, डॉ. रुपेश कवडे, कांतीलाल बागरेचा, विकास हौसलमल, भारत जाधव, संतोष लांडगे, ॲड. मंदार मुळीक, अमर गायकवाड सह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# सोलापूर शहरात कलम ३७ (१) लागू – कायदा व सुव्यवस्थेसाठी मनाई आदेश लागू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : सोलापूर शहर हे महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या प्रमाणावर धार्मिक सण, उत्सव, जयंती, पुण्यतिथी साजरे करणारे शहर आहे. सोलापूर शहरात छोट्या-मोठ्या कारणावरुन संप, आंदोलने, निदर्शने इत्यादि होत असतात. तसेच शहरात आगामी काळात तुलसी विवाह, गुरुनानक जयंती, इत्यादी सण, उत्सव संपन्न होणार आहेत. तसेच वक्फ अध्यादेश, मराठा, ओबीसी व धनगर आरक्षण वगैरेच्या माध्यमातून कायदा व सुव्यवस्थेस बाधा होण्याची दाट शक्यता लक्षात घेता महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१) अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आले आहेत.

पोलीस आयुक्तालय हद्दीत लागू असलेला हा आदेश २७ ऑक्टोबर २०२५ रोजी ००.०१ वाजल्यापासून ते १० नोव्हेंबर २०२५ रोजी मध्यरात्री २४.०० वाजेपर्यंत प्रभावी राहील, अशी माहिती पोलीस उपायुक्त (गुन्हे/विशा) गौहर हसन यांनी दिली.

या आदेशानुसार खालील गोष्टींवर बंदी घालण्यात आली आहे: मिरवणुका, सभा, पाच किंवा अधिक व्यक्तींचा जमाव , शस्त्रे, सोटे, तलवारी, सुरे, झेंडा लावलेली काठी किंवा इजा करण्यास वापरता येणाऱ्या वस्तू , ज्वालाग्राही व स्फोटक पदार्थ , दगड, फेकावयाची उपकरणे, प्रतिमा किंवा प्रेतयात्रांचे प्रदर्शन, सार्वजनिक घोषणा, असभ्य हावभाव, ग्राम्य भाषा, जाती-धर्माच्या भावना दुखावणारे सोंगे, चिन्हे किंवा साहित्य हा आदेश खंड अ ते फ हे ज्या सरकारी नोकरांना त्यांचे कर्तव्य व अधिकार बजावण्यासाठी उपनिर्दीष्ट वस्तु हाताळाव्या लागतात आणि ज्यांनी सक्षम पोलीस प्राधिकरणाची परवानगी घेतली आहे. अशा व्यक्तींना परवानगीतील अटीस पात्र राहुन सदरचे आदेश लागु पडणार नाहीत.

पोलीस प्रशासनाने शहरातील नागरिकांनी शांतता आणि कायदा-सुव्यवस्थेसाठी सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

# कळंब शहरातील शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेना शिंदे गट मधून शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनीधी/सुधाकर रणदिवे, दि. २७/१०/२०२५ रोजी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या संपर्क कार्यालयात मा. खासदार श्री ओमप्रकाश राजे निंबाळकर व मा. आमदार श्री.कैलास दादा पाटील यांच्या उपस्थितीत मोहसीन दादा मिर्झा, शफीक बागवान ,संदीप बिदादा, डॉ. साजेद चाऊस, जमील कुरेशी, धर्मेंद्र शहा, साबेर चाऊस, हमीद चाऊस, पवन वेदपाठक, उम्रान मिर्झा यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी पक्ष प्रवेश केला.

यावेळी तालुकाप्रमुख श्री सचीन काळे, माजी नगराध्यक्ष संजय मुंदडा, शहरप्रमुख विश्वजीत जाधव , सागर मुंडे, सुधीर भवर, सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना दीपावलीनिमित्त किराणा वस्तू वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बीड प्रतिनिधी/प्रतिनिधी :

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना पूरामुळे मोठा आर्थिक फटका बसला आहे. अनेकांच्या घरातील धान्यसाठा, शेतीतील पिके व जनावरांचे चारा याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अशा संकटग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समूह यांच्या वतीने दीपावली सणानिमित्त

**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समूहाचा उपक्रम**

किराणा वाटप करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरी चे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत पूरग्रस्त शेतकऱ्यांना त्यांच्या घरपोच किराणा वाटप करून सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवण्यात आली.

या उपक्रमामुळे अनेक शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून, दीपावलीचा खरा प्रकाश त्यांच्या घरात पोहोचविण्याचे कार्य समर्थ गांवकरी समूहाने केले आहे. स्थानिक नागरिकांनी व



शेतकऱ्यांनी या सामाजिक कार्याचे मनःपूर्वक स्वागत केले आहे.

**आम.डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या पाठीशी कायम भक्कमपणे उभे राहणार; कार्यकर्त्यांची ग्वाही**

# गौडवाडीच्या विराट मेळाव्यामुळे शेतकरी कामगार पक्षात नवचैतन्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला (तालुका प्रतिनिधी):- सांगोला तालुक्यात आगामी जिल्हा परिषद ,पंचायत समिती व नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गौडवाडी येथे आम.डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या उपस्थितीत झालेल्या मेळाव्यामुळे गावोगावी नवचैतन्याचे वातावरण तयार झाले आहे. स्व.आबासाहेब यांच्याप्रमाणे आम्ही देखील आमच्या जीवात जीव असेपर्यंत आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहणार असल्याची ग्वाही कार्यकर्त्यांसह पदाधिकार्यांनी यावेळी दिली.

गौडवाडी ता सांगोला येथे शेतकरी कामगार पक्षाचा रविवार दि.२६ ऑक्टोबर रोजी सायंकाळच्या सुमारास विराट मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांचा डाळिंबाचा हार करून भव्य नागरी सत्कार करण्यात आला. .यावेळी शेकाप चिटणीस दादाशेठ बाबर, दिपक गोडसे ,शिवाजीराव व्हनमाने यांच्यासह शेतकरी कामगार पक्षासह पुरोगामी युवक संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




पुढे बोलताना आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख म्हणाले, गौडवाडी गाव स्व.आबासाहेबांचे असून या गावाने गेल्या ५० वर्षाच्या काळात शेकाप सह देशमुख कुटुंबियांना भरपूर प्रेम दिले आहे..येणार्या काळात देखील आमच्या कुटूंबासह शेतकरी कामगार पक्षाच्या पाठीमागे ठाम पणे उभा राहून साथ द्यावी असे आवाहन करुन मी स्वतः कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा असून जर कोणी सर्वसामान्य कार्यकर्त्यावर दादागिरी, दमदाटी केली तर ती खपवून घेणार नसल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले.

हा मेळावा गौडवाडीतील १०० तरुण कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव झाला.या मेळाव्याचे खास वैशिष्ट्ये म्हणजे कोळा ते गौडवाडी अशी भव्य बाईक रॅली काढण्यात आली. यामध्ये तब्बल ७५० मोटारसायकली सामील झाल्या होत्या. या मेळाव्यावरून आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांचे प्रचंड आकर्षण सांगोला तालुक्यातल्या जुन्या आणि युवा पिढीला आजही दिसून आले.

**कार्यकर्त्यांनी आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांना घेतले डोक्यावर**

**गौडवाडी येथे ऐतिहासिक भूमीमध्ये मध्यंतरीच्या घडामोडीमुळे पहिली बंडाची ठिणगी पडली.या ठिणगीचे रूपांतर वादळात झाले. त्यामुळे कोळा जिल्हा परिषद गटातील सर्वसामान्य जनतेने मेळाव्याच्या पार्श्वभूमीवर अक्षरशः आमदार डॉ बाबासाहेब देशमुख यांना डोक्यावर घेतले.गेल्या पन्नास-साठ वर्षाचा तोच जोश, उत्साह पुन्हा दिसून आला.**

कार्यकर्त्यांचा जोश, उत्साह, फटाक्याची अतिश बाजी, हलग्याचा निनाद , लढण्याची हिंमत आणि ताकद या मेळाव्यात दिसून आली. जरी पुढारी पक्ष सोडून गेले तरी शेतकरी कामगार पक्षाची भिस्त आज ही सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या जीवावर तशीच असल्याचे चित्र मेळाव्यात दिसून आले. मेळाव्याला संबोधित करताना आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी आक्रमक भाषण करून नवचैतन्य निर्माण केले.